शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## गणेश मूर्तींची उंची वाढली; आता गणेश भक्तांनी विचारांची उंची वाढवावी!

सांस्कृतिक व प्रबोधनपर उपक्रमांना प्राधान्य द्या; झाडे लावा, नशामुक्तीचा संदेश द्या, स्वच्छतेचा संकल्प करा; डीजेमुक्त मिरवणुकीतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्याचे आवाहन




**जालना । प्रतिनिधी**

गणेशोत्सव हा केवळ उत्सव, सजावट, रोषणाई आणि मिरवणुकीपुरता मर्यादित न राहता समाजप्रबोधन, संस्कृती संवर्धन आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनला पाहिजे. गेल्या काही वर्षांत गणेश मूर्तींची उंची, मंडपांची भव्यता आणि सजावटीवरील खर्च वाढताना दिसत आहे. मात्र, या भव्यतेसोबतच गणेश भक्तांनी आता आपल्या विचारांचीही उंची वाढविण्याची गरज आहे, अशी भावना समाजातून व्यक्त होत आहे. भगवान गणेश हे बुद्धी, विवेक आणि ज्ञानाचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला विधायक दिशा देणारे उपक्रम राबविणे हीच गणरायाची खरी सेवा ठरू शकते. गणेश मंडळांनी यंदाच्या उत्सवात केवळ मनोरंजनात्मक कार्यक्रमांऐवजी सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले जात आहे.

**उत्सवातून समाजात विचारांची पेरणी व्हावी**

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येतात. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचा उत्सवात सहभाग असतो. त्यामुळे गणेश मंडळांना समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्याची मोठी संधी उपलब्ध होते. या संधीचा उपयोग करून व्यसनमुक्ती, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या विषयांवर कार्यक्रम घेता येऊ शकतात. व्याख्याने, परिसंवाद, चित्रफिती, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे आदी उपक्रमांमधून समाजप्रबोधन करता येईल. गणेश मंडळांनी आपल्या मंडपाचा परिसर हा काही दिवसांसाठी 'प्रबोधन केंद्र' बनविण्याचा प्रयत्न केला तर उत्सवाची सामाजिक उपयुक्तता अनेक पटींनी वाढू शकते.

**'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश घराघरात पोहोचवा**

पर्यावरण संवर्धन हा आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. गणेश मंडळांनी केवळ मंडपात पर्यावरणपूरक सजावट करण्यापेक्षा उत्सवाच्या माध्यमातून प्रत्यक्ष वृक्षारोपणाचा उपक्रम हाती घ्यावा.

'एक गणेश मंडळशंभर झाडे', 'एक गणेशभक्तएक झाड' अशा संकल्पना राबविता येतील. मात्र, केवळ झाडे लावून फोटो काढण्याऐवजी लावलेली झाडे जगविण्याची जबाबदारीही मंडळांनी स्वीकारावी, अशी अपेक्षा आहे. मंडळांनी *(पान २ वर)*

## पुढील दोन वर्षात जालना जिल्ह्यातील पाचशे जिल्हा परिषद शाळांचा दर्जेदार विकास करा

आढावा बैठकीत पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे निर्देश



**मुंबई - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून करून देण्यासाठी सर्वसमावेश आराखडा तयार करावा. पुढील दोन वर्षांत जिल्ह्यातील पाचशे शाळांचा दर्जेदार विकास करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. नवीन वर्षात नवी शाळा' या संकल्पनेसह राज्याने आदर्श घ्यावा असे काम करा अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत जालना जिल्हा परिषद शाळांच्या विकासकामांचा पुन्हा एकदा आढावा घेतला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी दृरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यापूर्वीही १ सप्टेंबर रोजीच्या बैठकीत पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा परिषद शाळांचा आढावा घेऊन सूचना केल्या होत्या. त्यावेळी त्यांनी शाळांचा सर्वेकरून अहवाल देण्याचे निर्देश दिले होते. आज त्यावर चर्चा करून त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

**शाळांचा निधी जागरूकतेने खर्च करा**

शाळा आणि अंगणवाड्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणारा निधी नियोजनबद्ध, काटेकोर आणि परिणामकारक पद्धतीने खर्च करावा. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याबरोबरच विकासकामांचा दर्जाही उत्तम राखावा. जिल्ह्यातील शाळांचा विकास करताना आदर्श शाळेची संकल्पना डोळ्यासमोर ठेवावी. शाळांची आकर्षक रंगरंगोटी, उत्तम परिसर, आवश्यक पायाभूत सुविधा आणि दर्जेदार कामांवर भर द्यावा. जालना जिल्ह्यात विकसित होणाऱ्या या आदर्श शाळांचे अनुकरण राज्यातील तसेच इतर *(पान २ वर)*

## जालना मनपा उपक्रम: वर्षभर मोफत सेल्फ डिफेन्स व शिवकालीन क्रीडा प्रशिक्षण देणार - उपमहापौर राजेश राऊत

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिका आयुक्त मा. अंजली जी शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली व महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. संध्या संजय देठे यांच्या संकल्पनेतून दि. १ सप्टेंबर ते १० सप्टेंबर दरम्यान शहरातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या मोफत शिवकालीन क्रीडा व सेल्फ डिफेन्स शिबिराचा समारोप सोहळा दि. ११ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.




या १० दिवसांच्या शिबिराचा लाभ जालना शहरातील तब्बल ३००० महिला व मुलींनी घेतला. समारोप प्रसंगी प्रशिक्षण घेतलेल्या महिला व मुलींनी लाठी-काठी, तलवारबाजी व सेल्फ डिफेन्सची थरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी सर्व प्रशिक्षकांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला, तसेच सहभागी सर्व ३००० महिला व मुलींना महानगरपालिकेतर्फे प्रशस्तीपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर राजेश राऊत यांनी मोठी घोषणा केली पुढील काळात जालना शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत वर्षभर मोफत सेल्फ डिफेन्स व शिवकालीन मोहीम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागात हे प्रशिक्षण पोहोचवणार आहोत.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुक्त अंजली जी शर्मा होत्या. यावेळी मा नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेविका संगीता ताई गोरंट्याल, नगरसेवक अक्षय गोरंट्याल *(पान २ वर)*

## महाराष्ट्रस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर; नांदेडचा कृष्णा शिंदे प्रथम

टिकरिया सायन्स हॉबी सेंटरच्या स्पर्धेत राज्यभरातून २२३ विद्यार्थ्यांचा सहभाग; गुणवंतांना टेलिस्कोप, मायक्रोस्कोपसह विज्ञान साहित्याची पारितोषिके

**जालना । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक लेखनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने टिकरिया सायन्स हॉबी सेंटर, जालना यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्रस्तरीय विज्ञान निबंध लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. 'विज्ञान शिक्षण आणि मी' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध भागांतून तब्बल २२३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेत नांदेड येथील कृष्णा विजय शिंदे याने प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळविले.

विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे केवळ पाठ्यपुस्तकातील विषय म्हणून न पाहता त्यामागील तर्क समजून घ्यावा, प्रश्न विचारावेत, निरीक्षण करावे, चिकित्सक पद्धतीने विचार करावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्वतःचे मत मांडावे, हा या स्पर्धेमागील प्रमुख हेतू होता. राज्यभरातून मिळालेला प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांनी निबंधातून मांडलेले स्वतंत्र विचार पाहता हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला आहे.

विज्ञान हा केवळ परीक्षेतील गुण मिळविण्यासाठी अभ्यासायचा विषय नसून दैनंदिन जीवनाकडे पाहण्याची एक चिकित्सक दृष्टी आहे, हा विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी 'विज्ञान शिक्षण आणि मी' हा विषय निवडण्यात आला. या विषयावर विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षणाचा आपल्या विचारसरणीवर होणारा परिणाम, दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व, वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज, तंत्रज्ञानातील बदल, प्रयोगशीलता आणि भविष्यातील विज्ञानाच्या संधी अशा विविध अंगांनी आपले विचार मांडले.

निबंधाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ माहिती लिहिण्याऐवजी 'मी विज्ञानाकडे कसे पाहतो?', 'विज्ञान माझ्या जीवनात काय बदल घडवते?' आणि 'समाजाच्या विकासासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन का आवश्यक आहे?' अशा प्रश्नांवर स्वतःचा विचार करण्याची संधी मिळाली. स्पर्धेतील निबंधांचे परीक्षण श्री. विष्णू पाटील *(पान २ वर)*

नोंदणी क्र. HLI/BMT/RSR/(O)/586/17-18-2028

**युनियन अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. वसमत**

**कापड मार्केट, मोंढा रोड ता. वसमत जि. हिंगोली-४३१५१२**

Phone no.02454220103 e-mail id-unionbasmath@gmail.com

**अध्यक्ष - बेग रिजवान हिदायत**

दिनांक -११-०९-२०२६

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

प्रति,
मा. श्री.----------------------

**सभासद,**

संस्थेच्या सर्व सन्माननिय सभासंदाना सुचित करण्यात येते कि, युनियन अर्बन को- ऑप क्रेडीट सोसायटी लि. वसमत ता. वसमत जि. हिंगोली या संस्थेची वार्षीक सर्व साधारण सभा संस्थेचे अध्यक्ष श्री. बेग रिजवान हिदायत यांचे अध्येक्षतेखाली दिनांक २७/०९-२०२६ रोजी रविवार सकाळी ठिक ११.०० वाजता संस्था कार्यालय कापड मार्केट, मोढा रोड वसमत येथे आयोजित करण्यात आलेली असुन या सभेत पुढील विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे हि विनंती.

**सभे पुढील विषय :-**

१. मागील वार्षिक सभेचे वृंतात वाचुन कायम करणे
२. दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ चे आर्थीक पत्रकाचे वाचन करुन त्यास मंजुरी देणे.
३. दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ चे लेखा परिक्षण वाचन करुन दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे
४. दि. ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ चे लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकाची नेमणुक करणे.
५. नविन सभासद व कमी झालेल्या सभासदास मंजुरी देणे.
६. सन. २०२६-२०२७ या आर्थीक वर्षासाठी अंदाजपत्रक मंजुरी करणे.
७.सभे वेळेचे विषय मा. अध्यक्ष यांचे परवानगीने

**मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरुन**

**व्यवस्थापक**
**युनियन अर्बन को- ऑप क्रेडीट सोयासटी लि. वसमत**

## मंठ्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता बैठक; डीजे मुक्त गणेशोत्सवाचे आवाहन

**मंठा -प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलीस ठाण्यात शुक्रवारी शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत झालेल्या या बैठकीत गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत विविध सूचना देण्यात आल्या.बैठकीस



उपविभागीय पोलीस अधिकारी, परतूर, तहसीलदार मंठा, मुख्याधिकारी नगरपंचायत मंठा, गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा, कार्यकारी अभियंता महावितरण तसेच ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांच्यासह नगराध्यक्ष, नगरसेवक, शांतता समिती सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, सरपंच, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, पोलीस पाटील आणि विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.यावेळी गणेशोत्सव शांततेत, सलोख्याने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच गणेशोत्सव डीजे मुक्त साजरा करावा, ध्वनिप्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि ध्वनीवर्धकाच्या वापराबाबत शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या. *(पान २ वर)*

## श्री गणेश महासंघाने शिवभक्तांना बेलपत्र रोपे वाटप करून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**जालना - प्रतिनिधी**

श्री गणेश महासंघाच्यावतीने धार्मिक परंपरेसह पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देत शिवभक्तांना पवित्र बेलपत्र रोपांचे मोफत वाटप करण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम शुक्रवार दि. ११ सप्टेंबर रोजी श्री पंचमुखी महादेव मंदिरात मोठ्या उत्साहात व भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.



याप्रसंगी श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, गौरव बोरा, महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, युवा उद्योजक अर्जुन पित्ती, मार्गदर्शक बाबा नंद, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, कमलेश खरे, दुर्गेश कटोटीवाले, अमोल बांगड यांच्यासह परिसरातील नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदू संस्कृती व परंपरेत बेलपत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भगवान महादेवाला बेलपत्र अत्यंत प्रिय असून, त्रिमूर्तीचे प्रतीक मानल्या गेलेल्या त्रिदलाच्या अर्पणाने शिवकृपा प्राप्त होते, अशी दृढ धार्मिक श्रद्धा आहे. केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर वातावरणातील कार्बन शोषून हवा शुद्ध ठेवण्यात आणि आरोग्यासाठी आयुर्वेदातही बेल वृक्षाला संजीवनीचे *(पान २ वर)*

# संपादकीय...

## दोन दिवसांची डेडलाइन; वर्षभराच्या दिरंगाईचा हिशेब कोण देणार?

जालना शहराच्या स्वच्छतेसाठी तब्बल १५ कोटी रुपयांची निविदा वर्षभर रखडते, सहा वेळा त्यात सुधारणा केल्या जातात, चार संस्थांकडून सुमारे १२००-१२०० कागदपत्रे सादर केली जातात आणि अखेर महासभेत या संपूर्ण प्रक्रियेवरून प्रशासनाची कोंडी होते. एवढेच नव्हे तर निविदेच्या विलंबावरून प्रशासनातीलच अधिकाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप होतात आणि एका अधिकाऱ्याच्या निलंबनाचा ठराव महासभेत मंजूर होतो. हा प्रकार गंभीर आहे. कारण हा प्रश्न केवळ एका निविदेचा नाही; तो महानगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यक्षमतेचा, पारदर्शकतेचा आणि उत्तरदायित्वाचा आहे. सर्वात पहिला प्रश्न१५ कोटींची स्वच्छता निविदा वर्षभर का रखडली?

दुसरा प्रश्नया कालावधीत सहा वेळा निविदेत सुधारणा करण्याची वेळ का आली? तिसरा प्रश्नचार संस्थांच्या कागदपत्रांची छाननी पूर्ण करण्यासाठी वर्षभराचा कालावधी का लागला?

चौथा प्रश्नप्रक्रियेला दोन महिन्यांचा विलंब झाला असेल तर त्याची जबाबदारी त्या क्षणीच निश्चित का करण्यात आली नाही? आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्नजालनाकरांच्या करातून पैसा घेताना प्रशासनाची गती इतकी संथ का असावी?

प्रशासनाकडून प्रत्येक संस्थेची सुमारे १२०० कागदपत्रे असल्याचे कारण पुढे केले जाते. कागदपत्रांची संख्या मोठी असणे ही वस्तुस्थिती असू शकते; मात्र कागदपत्रांचा गठ्ठा नागरिकांच्या समस्यांपेक्षा मोठा कसा ठरू शकतो? आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कागदपत्रांची छाननी करण्यासाठी वर्षभर लागणे हे समर्थनीय कारण ठरू शकते का? दुसरीकडे शहरातील वास्तव अधिक भयावह आहे. अनेक भागांत कचऱ्याचे ढीग, तुंबलेले नाले, अस्वच्छ परिसर आणि डासांचा वाढता प्रादुर्भाव नागरिकांना सहन करावा लागत आहे. मग प्रश्न असामहानगरपालिका कागदांवर स्वच्छता करते की प्रत्यक्ष शहरात? महानगरपालिकेकडे १६ स्वच्छता निरीक्षक असल्याचे सभेत समोर आले. मग आणखी एक धारदार प्रश्न उभा राहतो१६ निरीक्षक असताना शहराच्या प्रत्येक प्रभागात स्वच्छतेची स्थिती तपासली जाते का? त्यांचे प्रत्यक्ष काम काय? अहवाल तयार करण्यापलीकडे नागरिकांच्या तक्रारी सोडविण्याची जबाबदारी कोणाची? स्वच्छता कर्मचारी काम करत नसतील तर कारवाई करा; निरीक्षक काम करत नसतील तर त्यांच्यावरही कारवाई करा. पण अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार या संपूर्ण साखळीतील जबाबदारी निश्चित करण्याची हिंमत प्रशासन दाखवणार आहे का? लेखाधिकारी रामेश्वर माने यांच्या भूमिकेवरून महासभेत गंभीर आरोप झाले आणि त्यांनी ते फेटाळले. आयुक्तांनी दोन नोटिसांना उत्तर मिळाले नसल्याचे सांगितले आणि निलंबनाचा ठराव मंजूर झाला. ही कारवाई योग्य-अयोग्य याचा अंतिम निर्णय संबंधित प्रक्रियेत होईल; मात्र त्यापलीकडचा प्रश्न अधिक गंभीर आहेएका अधिकाऱ्यावर कारवाई झाली म्हणजे वर्षभराच्या विलंबाची संपूर्ण जबाबदारी संपते का? जर निविदा प्रक्रियेत त्रुटी होत्या, तर त्या वेळेत दुरुस्त का झाल्या नाहीत? जर एखाद्या अधिकाऱ्यामुळे विलंब झाला, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याची दखल आधी का घेतली नाही? आणि जर प्रशासनाची प्रक्रिया नियमानुसारच सुरू होती, तर महासभेत एवढा संताप का निर्माण झाला? आता प्रशासनाला दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. ही मुदत म्हणजे केवळ निविदा फाईल पुढे नेण्याची डेडलाइन नाही; ही प्रशासनाच्या विश्वासार्हतेची परीक्षा आहे. पण निविदा मंजूर झाली तरी खरी परीक्षा त्यानंतर सुरू होणार आहे. कचरा वेळेवर उचलला जाईल का? नाले नियमित साफ होतील का? प्रत्येक प्रभागात स्वच्छता दिसेल का? कंत्राटदाराच्या कामावर कठोर देखरेख होईल का? निकृष्ट काम झाल्यास दंड होईल का? आणि सर्वात महत्त्वाचेनागरिकांच्या तक्रारींना उत्तर मिळेल का? महानगरपालिकेने आता 'काम सुरू आहे', 'प्रक्रिया सुरू आहे', 'फाईल तपासणीमध्ये आहे' या पारंपरिक उत्तरांच्या पलीकडे जावे लागेल. करदात्या नागरिकाला फाईलची स्थिती नको; त्याला आपल्या घरासमोरील स्वच्छ रस्ता हवा आहे.

१५ कोटींची निविदा ही जनतेच्या पैशांची बाब आहे. त्यामुळे तिची प्रक्रिया पारदर्शक असली पाहिजे, निर्णय वेळेत झाले पाहिजेत आणि प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. महासभेने प्रश्न विचारले आहेत. प्रशासनाने दोन दिवसांची मुदत घेतली आहे. आता बहाण्यांची नव्हे, परिणामांची वेळ आहे. कारण जालनाकरांचा साधा सवाल आहे वर्षभर फाईल का थांबली? जबाबदार कोण? शहर अस्वच्छ राहिले त्याची जबाबदारी कोणाची? जनतेच्या पैशातून १५ कोटी खर्च होणार असतील तर प्रत्येक रुपयाचा हिशेब कोण देणार?आणि शेवटी

महानगरपालिका स्वच्छतेची व्यवस्था चालवतेय की केवळ स्वच्छतेच्या नावाने फाईली चालवतेय? दोन दिवसांची मुदत संपल्यानंतर या प्रश्नांची उत्तरे कागदावर नव्हे.


## जाहीर प्रगटन

सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मौजे जालना, ता. जि. जालना, जालना महानगरपालिका हद्दीतील, संबंधित मालमत्ता पत्रकात नमूद असलेली प्लॉट क्र. १८, क्षेत्रफळ १६८.०० चौ.मी. ही मिळकत श्री. विजयकुमार यादवराव पाईकराव यांचेकडून श्री. सिद्धेश्वर भगवानराव बागल यांनी खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीच्या चतु: सीमा कागदपत्रा प्रमाणे पुढील प्रमाणे आहेत :-पूर्वेस : ६.०० मीटर रुंदीचा रस्ता पश्चिमेस : प्लॉट क्र. १९ दक्षिणेस : प्लॉट क्र. १७ उत्तरेस : प्लॉट क्र. १८ चा उर्वरित भागसदर मिळकती बाबत श्री. विजयकुमार यादववराव पाईकराव यांचेकडून श्री. सिद्धेश्वर भगवानराव बागल यांच्या नावे विक्रीचा करारनामा/ईसारपावती करण्यात आलेली असून, सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, हिस्सा, वारसाहक्क, ताबा, गहाण, बोजा, कर्ज, दावा, हरकत, न्यायालयीन वाद किंवा अन्य कोणताही हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत त्याबाबतची लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खालील पत्त्यावर सादर करावी. विहित मुदतीमध्ये कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्क, दावा अथवा हरकत नाही असे समजून श्री. सिद्धेश्वर भगवानराव बागल यांच्या नावे पुढील खरेदीखत/नोंदणीचा व्यवहार करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती अथवा दाव्यासाठी संबंधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहील.

**जाहीर प्रगटन देणारे**
**सिद्धेश्वर भगवानराव बागल**
**रा. मु. बठाण, ता. जि. जालना.**

**मार्फत**
**अधिवक्ता**
**आर.बि.मोरे पत्ता : रेल्वे स्टेशन रोड,जालना**
**मो. नं. : ९२८४८६०३०५**


# ब्रिक्सच्या माध्यमातून भारताचा नवा जागतिक अजेंडा

जागतिक राजकारण आणि अर्थकारणाच्या बदलत्या परिस्थितीत ब्रिक्स या संघटनेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. भारताकडे ब्रिक्सचे नेतृत्व असताना 'रिफॉर्म्स, इनोव्हेशन, कोऑपरेशन अँड सस्टेनेबिलिटी' अर्थात सुधारणा, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार प्रमुख आधारस्तंभांवर भारताने आपला अजेंडा पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भारताची भूमिका केवळ ब्रिक्समधील सदस्य देशाची न राहता विकसनशील आणि उदयोन्मुख राष्ट्रांचा आवाज प्रभावीपणे मांडणाऱ्या देशाची बनत आहे.

ब्रिक्सची सुरुवात ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या चार देशांच्या सहकार्याने झाली. पुढे दक्षिण आफ्रिकेचा समावेश झाला आणि अलीकडील काळात संघटनेचा विस्तारही झाला आहे. जगातील मोठी लोकसंख्या, मोठी बाजारपेठ, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि वाढती आर्थिक क्षमता असलेल्या देशांचा सहभाग ब्रिक्समध्ये असल्याने या संघटनेचे जागतिक महत्त्व मोठे आहे. बदलत्या जागतिक व्यवस्थेत विकसित राष्ट्रांच्या वर्चस्वाला पर्याय निर्माण करण्याच्या दृष्टीनेही ब्रिक्सकडे पाहिले जाते.

आज जग अनेक संकटांच्या वळणावर उभे आहे. युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अस्थिरता, व्यापारातील संघर्ष, महागाई, ऊर्जा संकट, हवामानबदल, अन्नसुरक्षा आणि तंत्रज्ञानातील स्पर्धा यामुळे अनेक देशांसमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा वेळी परस्पर सहकार्य, संवाद आणि सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. ब्रिक्स हे त्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरू शकते.

जागतिक संस्थांमध्ये सुधारणा हा भारताच्या अजेंड्याचा महत्त्वाचा भाग आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसह आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांमध्ये विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. जगाची आर्थिक आणि लोकसंख्यात्मक रचना बदलली असताना जुन्या व्यवस्थेत आवश्यक ते बदल होणे गरजेचे आहे. भारताने या सुधारणांसाठी ब्रिक्सच्या माध्यमातून व्यापक सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

नवोन्मेष आणि तंत्रज्ञान हे भविष्यातील विकासाचे प्रमुख आधार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, आरोग्य, शिक्षण, कृषी, अंतराळ संशोधन आणि नव्या ऊर्जा तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ब्रिक्स देशांनी सहकार्य वाढवले तर त्याचा मोठा फायदा सर्वसामान्य जनतेला होऊ शकतो. भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मिळवलेला अनुभव इतर विकसनशील देशांसाठी उपयुक्त ठरू शकतो.

त्याचबरोबर शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण यांना प्राधान्य देणे काळाची गरज आहे. आर्थिक विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखणे, स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे, पाण्याचे संवर्धन, अन्नसुरक्षा आणि हवामान बदलाचा सामना करणे आवश्यक आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष न राहता दोन्हींचा समन्वय साधणारे धोरण ब्रिक्सच्या माध्यमातून पुढे नेता येईल.

ब्रिक्स देशांमधील व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढवणे हेदेखील महत्त्वाचे आहे. परस्पर व्यापार वाढला, गुंतवणुकीला चालना मिळाली आणि स्थानिक चलनांमध्ये व्यवहार करण्याच्या पर्यायांवर सहकार्य झाले तर जागतिक आर्थिक व्यवस्थेत या देशांचा प्रभाव वाढू शकतो. मात्र यासाठी परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि संतुलित धोरण आवश्यक आहे.

ब्रिक्ससमोर आव्हानेही कमी नाहीत. सदस्य देशांच्या राजकीय भूमिका, आर्थिक हितसंबंध आणि परराष्ट्र धोरणांमध्ये अनेकदा मतभेद असतात. त्यामुळे सर्व प्रश्नांवर एकमत होणे शक्य नाही. मात्र मतभेद असतानाही सामायिक हिताच्या मुद्द्यांवर सहकार्य करणे हीच ब्रिक्सच्या यशाची खरी कसोटी ठरेल.

भारताने आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून ब्रिक्सला केवळ आर्थिक सहकार्याचे व्यासपीठ न ठेवता सुधारणा, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वत विकासाचा प्रभावी जागतिक मंच बनवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विकसनशील देशांच्या समस्या, त्यांच्या आकांक्षा आणि त्यांच्या विकासाचा मुद्दा जागतिक व्यासपीठावर ठामपणे मांडण्याची मोठी संधी भारताला मिळाली आहे. ब्रिक्सच्या माध्यमातून भारताने जगाला संघर्षाऐवजी सहकार्याचा, वर्चस्वाऐवजी समानतेचा आणि अस्थिरतेऐवजी शाश्वत विकासाचा मार्ग दाखवला, तर भारताचे जागतिक नेतृत्व निश्चितच अधिक भक्कम होईल. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताचा वाढता प्रभाव आणि ब्रिक्सची वाढती व्याप्ती ही देशासाठी निश्चितच आशादायी बाब आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# पान १ वरुन...

## गणेश मूर्तींची...

परिसरातील मोकळ्या जागा, शाळा, रस्त्यांच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला तर गणेशोत्सवाचा पर्यावरणीय ठसा वर्षभर कायम राहू शकतो.

**नशामुक्तीचा जागर करा; गुटखा-तंबाखूला नकार द्या**

तरुण पिढीसमोर व्यसनाधीनतेचे वाढते आव्हान आहे. गुटखा, तंबाखू, सिगारेट तसेच इतर व्यसनांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. गणेश मंडळांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहून 'गणरायाच्या साक्षीने व्यसनाला कायमचा निरोप' असा संदेश देण्याची गरज आहे.

व्यसनमुक्ती जनजागृती रॅली, समुपदेशन, तज्ज्ञांची व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्य आणि युवकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करता येतील. गणेश मंडळांच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनाविरोधात सकारात्मक वातावरण निर्माण झाले तर त्याचा निश्चितच मोठा सामाजिक परिणाम होऊ शकतो.

**विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनाची दारे उघडा**

आज अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा, करिअर, उच्च शिक्षण, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या संधींबाबत संभ्रमात असतात. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मंडळांनी करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शैक्षणिक समुपदेशन, कौशल्य विकास आणि डिजिटल शिक्षण यांसारखे कार्यक्रम आयोजित करावेत. यशस्वी अधिकारी, डॉक्टर, अभियंते, शिक्षक, उद्योजक, क्रीडापटू आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आमंत्रित करता येईल. अशा उपक्रमातून एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या आयुष्याची दिशा मिळू शकते.

**सर्वधर्म समभावाचा संदेश देणारा गणेशोत्सव**

गणेशोत्सव हा समाजाला जोडणारा उत्सव ठरला पाहिजे. जात, धर्म, भाषा आणि पंथाच्या भिंती ओलांडून सर्वांना सोबत घेणारा गणेशोत्सव ही काळाची गरज आहे.

मंडळांनी सर्वधर्म समभाव, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता यावर आधारित कार्यक्रम घ्यावेत. विविध धर्मांच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचा परिचय करून देणारे उपक्रम, एकात्मतेचे संदेश देणारे कार्यक्रम आणि सर्व समाजघटकांच्या सहभागातून आयोजित उपक्रमांमुळे सामाजिक बंधुभाव अधिक दृढ होऊ शकतो.

**डीजेच्या दणदणाटापेक्षा संस्कृतीचा निनाद महत्त्वाचा**

गणेश विसर्जन मिरवणुकीतील डीजेच्या वाढत्या आवाजाबाबत दरवर्षी नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जाते. मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण तसेच विद्यार्थ्यांना त्रास होतो. ध्वनिप्रदूषणाचा प्रश्नही गंभीर आहे.

त्यामुळे गणेश मंडळांनी डीजेमुक्त मिरवणुकीचा आदर्श निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आहे. डीजेच्या प्रचंड आवाजाऐवजी ढोल-ताशे, लेझीम, तुतारी, हलगी, झांज, मृदंग आणि इतर पारंपरिक वाद्यांना स्थान देऊन मिरवणुकीतून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविता येईल. मिरवणूक म्हणजे केवळ आवाज आणि शक्तिप्रदर्शन नव्हे; तर आपली संस्कृती, परंपरा आणि संस्कार जगाला दाखविण्याची संधी आहे. त्यामुळे पारंपरिक वाद्यांच्या तालावर शिस्तबद्ध आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारी मिरवणूक हा गणेशोत्सवाचा नवा आदर्श ठरू शकतो.

**स्वच्छतेचा संदेश कृतीतून द्या**

गणेश मंडळांनी आपल्या मंडपाभोवती स्वच्छता राखण्याबरोबरच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. प्लास्टिकचा कमीत कमी वापर, कचरा वर्गीकरण, निर्माल्य संकलन, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती असे उपक्रम राबविता येतील. 'माझा परिसरमाझी जबाबदारी' हा संदेश गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

**भव्यतेपेक्षा सामाजिक बांधिलकी महत्त्वाची**

गणेश मंडळांमध्ये सजावट आणि रोषणाईच्या माध्यमातून एकमेकांपेक्षा सरस ठरण्याची स्पर्धा दिसून येते. मात्र, या स्पर्धेला विधायक वळण देण्याची वेळ आली आहे. सर्वाधिक भव्य मंडप कोणाचा, यापेक्षा सर्वाधिक सामाजिक उपक्रम कोणत्या मंडळाने राबविले, याची स्पर्धा निर्माण झाली पाहिजे.

एखाद्या मंडळाने वृक्षारोपण केले, दुसऱ्याने रक्तदान शिबिर घेतले, तिसऱ्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिले, तर अन्य मंडळाने व्यसनमुक्ती किंवा आरोग्य जनजागृती केलीअशा प्रकारची सकारात्मक स्पर्धा समाजासाठी अधिक उपयुक्त ठरेल.

**गणरायाच्या चरणी 'विचारांचा प्रसाद' अर्पण करण्याची गरज**

गणेशोत्सव काही दिवसांचा असला तरी त्यातून दिलेला सामाजिक संदेश वर्षानुवर्षे नागरिकांच्या मनात राहू शकतो. म्हणूनच मंडळांनी यंदाच्या उत्सवात 'एक मंडळएक सामाजिक संकल्प' अशी भूमिका स्वीकारावी. गणेश मूर्तीची उंची किती आहे, मंडप किती मोठा आहे किंवा मिरवणुकीत किती मोठा आवाज आहे, यापेक्षा उत्सवामुळे समाजाच्या विचारांची उंची किती वाढली, हे अधिक महत्त्वाचे ठरावे. गणरायाला फुलांचा हार, मोदक आणि नैवेद्य अर्पण करण्याबरोबरच स्वच्छतेचा संकल्प, व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा, पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, सामाजिक सलोखा आणि भारतीय संस्कृतीच्या जतनाचा निर्धार अर्पण केला, तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचा उत्सव ठरेल.

'मूर्तीची उंची वाढत असताना विचारांची उंचीही वाढू द्या; डीजेचा आवाज कमी करून संस्कारांचा आवाज बुलंद करू द्या,' हा संदेश यंदाच्या गणेशोत्सवातून प्रत्येक मंडळाने आणि प्रत्येक गणेशभक्ताने समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

## पुढील दोन...

राज्यांतील शाळांनी करावे, अशा गुणवत्तेचे काम झाले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**नवीन वर्षात नवी शाळा**

'नवीन वर्षात नवी शाळा' ही संकल्पना घेऊन संबंधित यंत्रणांनी अभियान स्वरूपात काम करावे. शाळांच्या विकासकामांबाबत पुढील आढावा बैठक आपण स्वतः जालना येथे घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजनांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचाही आढावा घेतला. या योजनांसाठी उपलब्ध निधी निर्धारित वेळेत खर्च करावा. मंजूर कामांना कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेऊन ती गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## जालना मनपा ...

नगरसेविका सुशीला ताई भास्कर-दानवे, नगरसेविका दर्शना ताई झोल-खोतकर, नगरसेविका श्रद्धा साळवे, नगरसेवक विरेंद्र जी धोका, अतिरिक्त आयुक्त नंदा मनपा गायकवाड समाज विकास अधिकारी अनंत त्रिभुवन अभियंता कोमल गावंडे महिला बाल विकास विभाग प्रमुख प्रमिला मोरे यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थींचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्रस्तरीय विज्ञान...

आणि श्री. महेश गवळी यांनी केले. निबंधाचे परीक्षण करताना केवळ भाषेचा किंवा लेखनशैलीचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला विशेष महत्त्व देण्यात आले.

निबंधाचा आशय, वैज्ञानिक दृष्टिकोन, विषयाची मांडणी, सर्जनशीलता, भाषाशैली आणि विद्यार्थ्यांचे स्वतंत्र विचार या विविध निकषांच्या आधारे परीक्षण करण्यात आले.

त्यामुळे या स्पर्धेत पाठांतरातून मिळालेल्या माहितीपेक्षा विषयाकडे स्वतःच्या दृष्टीने पाहण्याची क्षमता, वैज्ञानिक विचारांची मांडणी आणि सर्जनशीलता यांना महत्त्व मिळाले. सुरुवातीला स्पर्धेत केवळ तीन विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या निबंधांची गुणवत्ता लक्षात घेता अधिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने पारितोषिकांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.

यामुळे विविध क्रमांकांबरोबरच उत्तेजनार्थ पारितोषिकांचाही समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

प्रथम क्रमांक कृष्णा विजय शिंदे नांदेड प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या कृष्णा विजय शिंदे याला टेलिस्कोप हे पारितोषिक देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांक सानिका संभाजी मस्के आष्टी, बीड, आदित्य संदीप लांडगे राहुरी, अहिल्यानगर द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मायक्रोस्कोप देण्यात येणार आहे. तृतीय क्रमांक अनुजा हनुमंत लोंढे घनसावंगी, आराध्या विजय कोल्हे जालना तृतीय क्रमांकासाठी पेरिस्कोप हे पारितोषिक देण्यात येणार आहे. चतुर्थ क्रमांक उमेश ज्ञानेश्वर शेलके जालना ओम विजय शिंदे नांदेड चतुर्थ क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना केलिडिओस्कोप देण्यात येणार आहे.

पंचम क्रमांक अर्णव हेमंत बावसकर रायगड, साची संजय कालेगोरे जिंतूर पंचम क्रमांकासाठी मॅग्नेटिक कंपास हे विज्ञान साहित्य पारितोषिक म्हणून देण्यात येणार आहे. स्पर्धेत उल्लेखनीय सहभाग नोंदविणाऱ्या आणखी आठ विद्यार्थ्यांची उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये भाग्यश्री विक्रम कुऱ्हे सुहागण, परभणी; पूर्वा किरणसिंह जनकवार तलणी; ऋचा योगेश्वर पाटील तलणी; नंदिनी भगवान शहाणे जालना; ईश्वरी बालाजी भोसले पूर्णा; सृष्टी अमोल बोंदार्डे बीड; रामसिंह नंदलाल सलामपूरे जालना आणि संध्या शंकरराव पांगरकर जालना यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना सायन्स प्रोजेक्ट किट देऊन त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या स्पर्धेतील पारितोषिकांचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक स्वरूपाची बक्षिसे न देता विज्ञानाशी प्रत्यक्ष जोडणारे साहित्य देण्यात येणार आहे. प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला टेलिस्कोप, द्वितीय क्रमांकासाठी मायक्रोस्कोप, तृतीय क्रमांकासाठी पेरिस्कोप, चतुर्थ क्रमांकासाठी केलिडिओस्कोप आणि पंचम क्रमांकासाठी मॅग्नेटिक कंपास देण्यात येणार आहे.

यामुळे पारितोषिक मिळाल्यानंतरही विद्यार्थ्यांची विज्ञानातील उत्सुकता कायम राहावी, निरीक्षणाची सवय लागावी आणि विज्ञानाकडे प्रत्यक्ष प्रयोग व अनुभवातून पाहण्याची संधी मिळावी, हा यामागील हेतू आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व २२३ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

त्यामुळे केवळ विजेत्यांचाच नव्हे, तर स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रयत्नांचा गौरव करण्याचा प्रयत्न आयोजकांनी केला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे लवकरच प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ माहिती आत्मसात करणे पुरेसे नाही. मिळालेल्या माहितीची सत्यता तपासणे, प्रश्न विचारणे, कारण-परिणाम समजून घेणे आणि पुराव्याच्या आधारे निष्कर्ष काढणे या सवयी विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या विज्ञान निबंध स्पर्धांना विशेष महत्त्व प्राप्त होते. निबंध लेखनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या विचारांना शब्दबद्ध करण्याची संधी मिळते. त्यातून त्यांची निरीक्षणशक्ती, तर्कशक्ती, लेखनकौशल्य आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होते.

विज्ञान म्हणजे केवळ प्रयोगशाळा किंवा पाठ्यपुस्तक नव्हे, तर प्रत्येक प्रश्नामागे 'का?' विचारण्याची वृत्ती आहे. ही वृत्ती लहान वयात विकसित झाली तर भविष्यात संशोधक, वैज्ञानिक, अभियंते, डॉक्टर, तंत्रज्ञ आणि समस्यांकडे तर्कशुद्धपणे पाहणारे जबाबदार नागरिक घडण्यास मदत होऊ शकते.

जालना येथील टिकरिया सायन्स हॉबी सेंटरने आयोजित केलेल्या या स्पर्धेला राज्यातील विविध भागांतून २२३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जालना, नांदेड, बीड, अहिल्यानगर, रायगड, परभणी आदी विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचा सहभाग असल्याने स्पर्धेला महाराष्ट्रस्तरीय स्वरूप मिळाले. विशेष म्हणजे ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांनीही या स्पर्धेत सहभाग घेऊन आपली वैज्ञानिक जिज्ञासा आणि लेखनक्षमता दाखवून दिली. अशा विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. या उपक्रमाबाबत बोलताना टिकरिया सायन्स हॉबी सेंटरचे श्री. विनीत टिकरिया यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता प्रश्न विचारणे, विचार करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्वतःचे मत मांडणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. २२३ विद्यार्थ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा उपक्रमाच्या यशाचे द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारे विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना विज्ञान शिकवताना केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे हा उद्देश न ठेवता त्यांच्या मनात कुतूहल, प्रश्न आणि प्रयोगशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. एखाद्या घटनेमागील कारण शोधणे, स्वतः प्रयोग करून पाहणे, निरीक्षणातून निष्कर्ष काढणे आणि चुकीचे ठरल्यास पुन्हा प्रयत्न करणे, हीच वैज्ञानिक वृत्तीची सुरुवात आहे.

'विज्ञान शिक्षण आणि मी' या विषयाभोवती विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार ही त्याच दिशेने झालेली एक सकारात्मक पायरी आहे. टेलिस्कोपातून आकाशाकडे पाहणारा, मायक्रोस्कोपातून सूक्ष्म जग समजून घेणारा किंवा सायन्स प्रोजेक्ट किटमधून स्वतः प्रयोग करणारा विद्यार्थी उद्याचा संशोधक ठरू शकतो. त्यामुळे अशा स्पर्धांमधील पारितोषिकांची खरी किंमत ही त्यांच्या आर्थिक मूल्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक कुतूहलात आहे. महाराष्ट्रस्तरीय या विज्ञान निबंध स्पर्धेच्या निकालातून एक बाब अधोरेखित झाली आहेविद्यार्थ्यांना योग्य विषय, योग्य व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळाले तर त्यांच्या विचारांना निश्चितच वैज्ञानिक दिशा मिळू शकते. २२३ विद्यार्थ्यांचा सहभाग हा केवळ एका निबंध स्पर्धेचा आकडा नसून विज्ञानाकडे उत्सुकतेने पाहणाऱ्या नव्या पिढीची आशादायी झलक आहे.

## मंत्यात गणेशोत्सवाच्या...

गणेश मंडळांनी उत्सवासाठी आवश्यक त्या परवानग्या घेऊनच आयोजन करावे तसेच सामाजिक सलोखा व शांतता अबाधित राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.गणेशोत्सव काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी नागरिक व गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असेही यावेळी सांगण्यात आले. बैठक शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

## श्री गणेश महासंघाने...

स्थान आहे. हाच दुहेरी हेतू समोर ठेवून महासंघाने हा उपक्रम राबविला.

याप्रसंगी बोलताना श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल म्हणाले की, धर्माची खरी शिकवण ही प्रकृती आणि संस्कृतीच्या रक्षणात आहे. शंकराला बेलपत्र वाहताना प्रत्येकाने आपल्या घरात किंवा परिसरात एक तरी बेलवृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, हीच महादेवाची खरी सेवा ठरेल. महासचिव भूषण यादव म्हणाले की, सध्याच्या काळात वाढते प्रदूषण रोखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. धार्मिक उपक्रमांना पर्यावरण संवर्धनाची जोड देऊन सामाजिक बांधिलकी जपणे हाच आमच्या महासंघाचा मुख्य उद्देश आहे. भाविकांनी महासंघाच्या या अभिनव उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

# प्रशासकीय दौऱ्यानिमित्त संत ज्ञानेश्वर विद्यालय हसनाबाद येथील विविध उपक्रमांची पाहणी

हसनाबाद (प्रतिनिधी) : संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हसनाबाद येथे प्रशासकीय दौऱ्यानिमित्त शिक्षण विभागातील मान्यवर अधिकाऱ्यांनी भेट देऊन विद्यालयातील विविध शैक्षणिक, कौशल्याधारित व नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी केली.यावेळी प्रधानसचिव शिक्षण विभाग माननीय श्री. रणजीतसिंह देवल साहेब, संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. रावसाहेब पाटील दानवे दादा, उपसंचालक पुणे डॉ एकनाथ आंबोकर सर, शिक्षणाधिकारी श्री. बाळासाहेब खरात,श्रीमती संगीता भागवत श्रीमती लता सानप प्राचार्य डॉ सनवी देशमुख उपशिक्षणाधिकारी श्री.संजय कायंदे साहेब, उपशिक्षणाधिकारी योजना श्री.रविंद्र जोशी सर, डॉ. प्रकाश मानटे गटशिक्षणाधिकारी श्री. गजानन वाळकेअधीक्षक पोषण आहार श्री साळवे सरप्राचार्य माणिक दानवे सर,संजय तोटे,भारत कदम,सय्यद फेरोज,योगीराज सोनुने, राहुल निकम, श्रीमती केदार,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले. विद्यार्थ्यांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती मान्यवरांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह दिली.विद्यालयातील चांद्रयान-३ प्रतिकृतीची पाहणी मान्यवरांनी केली. विद्यार्थिनींनी काडी फिरविण्याचे प्रात्यक्षिक, तसेच लेझीमचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. स्काऊट-गाईडच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध सलामी देऊन मान्यवरांचे स्वागत केले.भारतीय संस्कृती, इतिहास आणि वारसा जतन करण्याचा संदेश देत विद्यार्थिनींनी ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या संवर्धनावर आधारित सुंदर पोवाडा सादर केला. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांसोबतच इतिहासाविषयीची जाण आणि सामाजिक बांधिलकीही दिसून आली.यानंतर मान्यवरांनी विज्ञान प्रयोगशाळेला भेट दिली.

विद्यार्थिनींनी विविध वैज्ञानिक प्रयोग करून दाखविले. कॉम्प्युटर लॅबमध्ये विद्यार्थ्यांनी विविध फाईल्स, संगणकीय उपक्रम व डिजिटल शिक्षणाची माहिती दिली. तसेच विद्यालयात सुरू असलेल्या शिलाई मशीन प्रशिक्षणासह विविध कौशल्याधारित उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांनी मान्यवरांना दिली.विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यामागील कारणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण, अध्ययन-अध्यापनाची प्रभावी पद्धती, विद्यार्थ्यांसाठी घेतले जाणारे वेगवेगळे वर्ग, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी केले जाणारे नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती प्राचार्य माणिक दानवे सर व सर्व शिक्षकवृंदाने मान्यवरांना दिली.विशेष म्हणजे विद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेले वृक्षारोपण व सुमारे एक हजार वृक्षांची हिरवाई पाहून उपस्थित अधिकारी भारावून गेले. शिक्षणासोबत पर्यावरण संवर्धन, कौशल्य विकास, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा आणि संस्कार यांचा सुंदर समन्वय विद्यालयात साधला जात असल्याचे यावेळी प्रकर्षाने जाणवले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण देण्याच्या विद्यालयाच्या प्रयत्नांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

# त्र्यंबकेश्वर देवस्थानचा १३ कोटींचा निधी वाचला; मंदिर महासंघाच्या कायदेशीर लढ्याला मोठे यश!

## त्र्यंबक नगरपरिषदेने घनकचऱ्यासाठीची १३ कोटींची मागणी घेतली मागे!

**नाशिक/त्र्यंबकेश्वर -प्रतिनिधी**

श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या भाविकांच्या देणगीतून प्राप्त झालेला १३ कोटी रुपयांचा निधी त्र्यंबक नगरपरिषदेकडे घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्याच्या प्रस्तावाला 'मंदिर महासंघ, महाराष्ट्र' यांनी केलेला कायदेशीर विरोध यशस्वी ठरला आहे. भाविकांनी अर्पण केलेला पैसा केवळ देवस्थान आणि हिंदू संस्कृतीच्या संवर्धनासाठीच वापरला जावा, तो नागरी कामांसाठी वळवणे कायदेशीरदृष्ट्या अयोग्य आहे, अशी ठाम भूमिका महासंघाने घेतली होती. या अनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री, विधी व न्याय राज्यमंत्री व धर्मादाय आयुक्त यांना सविस्तर निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी धर्मादाय आयुक्तांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. शासनाकडून सुरू झालेल्या या चौकशीमुळे आणि मंदिर महासंघाच्या अभ्यासपूर्ण विरोधामुळे अखेर नगरपरिषदेला १३ कोटी रुपयांच्या



निधीची मागणी मागे घ्यावी लागली आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी मंदिर महासंघाच्या शिष्टमंडळाने नगरपरिषद त्र्यंबकेश्वरचे मुख्याधिकारी श्री. गोविंद जाधव व नाशिक येथील सहधर्मादाय आयुक्त यांची भेट घेतली. या वेळी महासंघाने आपला विरोध दर्शवणारे महत्त्वाचे कायदेशीर व प्रशासकीय मुद्दे निदर्शनास आणून दिले. नाशिकच्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी शासनाने ३४ हजार कोटींचा निधी मंजूर केला असून, त्यापैकी २७७ कोटी रुपये केवळ त्र्यंबकेश्वरच्या रस्ते व घनकचरा व्यवस्थापनासाठीच मंजूर आहेत, तसेच कचरा व्यवस्थापनासाठी भाविकांवर व नागरिकांवर कर आकारून आवश्यक तो निधी उभा करण्याचा कायदेशीर अधिकार त्र्यंबक नगरपरिषदेला आहे. याशिवाय कायद्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या एकूण भांडवली खर्चापैकी २५ टक्के निधी घनकचरा व्यवस्थापनासाठी राखून ठेवणे बंधनकारक असते. हे सर्व प्रशासकीय व आर्थिक पर्याय उपलब्ध असताना घनकचरा व्यवस्थापनासाठी देवस्थानच्या निधीची मागणी करणे सर्वथा अयोग्य असल्याचे महासंघाने सप्रमाण स्पष्ट केले. यापूर्वी शिर्डी संस्थानाचा ५०० कोटींचा निधी निळवंडे धरणासाठी देण्याचा ठराव उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर रोखण्यात आल्याचा दाखलाही या वेळी देण्यात आला. तसेच सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयानुसार मंदिराचा पैसा अन्य विकासकामांसाठी देता येत नसल्याचे सप्रमाण लक्षात आणून दिले. या वेळी मंदिर महासंघाचे श्री. संदिप वाघ, सकल हिंदू समाजाचे श्री. कैलास देशमुख, अधिवक्ता प्रेरणा वाघ, श्री. अमोल शिंदे, श्री. श्रेयस दाणी व श्रीमती संजिवनी दाणी उपस्थित होते. मंदिर महासंघाने मांडलेले हे सर्व कायदेशीर मुद्दे लक्षात घेतल्यानंतर प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. या विषयावर स्पष्टीकरण देताना मुख्याधिकारी श्री. गोविंद जाधव यांनी सांगितले की, ''सध्या नगरपरिषदेने १३ कोटी रुपयांच्या निधी मागणीचा असा कोणताही ठराव केलेला नाही. पूर्वी केवळ मागणी केली होती.'' पूर्वी ५-६ पानांचे लेखी स्पष्टीकरण मंदिर महासंघाला देऊन १३ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करणाऱ्या नगरपरिषदेने आता आपली भूमिका बदलत स्पष्ट केले आहे की, ''यापुढे नगरपरिषदेकडून असा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी मंदिर महासंघाशी चर्चा केली जाईल.''

# स्वाधार योजना, शासकीय वसतिगृह प्रवेशात बनावट कागदपत्रे आढळल्यास कारवाई

**जालना – प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना तसेच शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत शासनाच्या योजनांचा लाभ मिळविण्याच्या उद्देशाने काही विद्यार्थी खोटी, बनावट अथवा फेरफार केलेली कागदपत्रे सादर करीत असल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित अर्जांची आणि प्रकरणांची

सखोल तपासणी करण्यात येणार असून, कागदपत्रे बनावट अथवा खोटी आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. स्वाधार योजना किंवा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी बनावट भाडेकरारनामा, खोटे बोनाफाईड प्रमाणपत्र, बनावट वसतिगृह प्रमाणपत्र, खोटी उपस्थिती, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र किंवा इतर आवश्यक कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज अथवा प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याने

यापूर्वी स्वाधार योजनेचा किंवा शासकीय वसतिगृहाचा लाभ घेतला असल्यास तो लाभ नियमानुसार रद्द करून शासनाकडून अदा करण्यात आलेली रक्कम वसूल केली जाणार आहे. प्रकरणाच्या स्वरूपानुसार संबंधितांविरुद्ध लागू कायद्यानुसार फौजदारी कारवाईही करण्यात येईल. स्वाधार योजना किंवा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज भरताना इंटरनेट कॅफे अथवा ऑनलाइन सेवा केंद्र चालकांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, कागदपत्रांमध्ये फेरफार करणे, खोटी माहिती अपलोड करणे, बनावट

प्रमाणपत्रे तयार करून देणे किंवा विद्यार्थ्यांना शासनाची फसवणूक करण्यास जाणीवपूर्वक मदत करणे आढळल्यास संबंधित कॅफे चालक, मालक किंवा व्यक्तीविरुद्धही नियमानुसार कठोर कायदेशीर आणि फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय अशा गैरप्रकारात कोणतीही व्यक्ती, संस्था, महाविद्यालयीन अधिकारी किंवा कर्मचारी अथवा इतर संबंधित व्यक्ती सहभागी असल्याचे तपासणीत निष्पन्न झाल्यास, त्यांच्या भूमिकेनुसार संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. स्वाधार योजना आणि शासकीय वसतिगृहाच्या योजनांचा लाभ केवळ पात्र विद्यार्थ्यांनाच शासनाच्या नियमानुसार मिळावा, यासाठी प्राप्त अर्ज आणि कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अर्ज करताना केवळ खरी, वैध आणि अधिकृत कागदपत्रेच सादर करावीत. बनावट कागदपत्रे तयार करून

देणाऱ्या व्यक्तींच्या आमिषाला बळी पडू नये आणि शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. बनावट कागदपत्रे सादर करणारे विद्यार्थी तसेच अशा गैरप्रकारास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहाय्य करणाऱ्या व्यक्तींवर कोणतीही दयामाया न दाखविता नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संबंधित विभागाकडून देण्यात आला आहे.

# मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्जाची मुदत

**जालना – प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत अनुसूचित जाती

व नवबौद्ध घटकांतील स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधने उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मिनी ट्रॅक्टर योजनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधने खरेदीसाठी कमाल ३ लाख ५० हजार रुपये किमतीपर्यंत ९० टक्के शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. यामध्ये कमाल ३ लाख १५ हजार रुपयांचे अनुदान अनुज्ञेय असून, उर्वरित १० टक्के रक्कम म्हणजेच ३५ हजार रुपये लाभार्थी बचत गटाचा स्वहिस्सा राहणार आहे. पात्र बचत गटांनी://.या संकेतस्थळावर जाऊन प्रथम नोंदणी करावी.

नोंदणीनंतर प्राप्त लॉगिनद्वारे ऑनलाइन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे स्वरूपात अपलोड करावीत. ऑनलाइन अर्ज पूर्णपणे भरून अंतिमरित्या सादर केल्यानंतर अर्जाची प्रिंट अथवा मूळ प्रत तसेच ऑनलाइन अर्जासोबत अपलोड केलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या प्रती ३०सप्टेंबर २०२६ पर्यंतसंबंधित कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज सादर करून त्याची प्रत व कागदपत्रे कार्यालयात जमा न करणाऱ्या अर्जांचा छाननीच्या वेळी विचार केला जाणार नाही, असे समाज कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे. योजनेची पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज भरण्याची सविस्तर प्रक्रिया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करून त्याची प्रत कार्यालयात जमा

करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनडॉ. अनिता राठोड, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालनायांनी केले आहे.

# रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र; २०२६ अतंर्गत आयोजीत रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन

## जालना येथे २९ सप्टेंबरला रोजगार महाकुंभ; युवकांना रोजगाराच्या संधी

**जालना – प्रतिनिधी**

देशातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६'या राज्यव्यापी उपक्रमाचे

आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभर एकाच दिवशी ८०० रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. जालना जिल्ह्यातील रोजगार महाकुंभाचे आयोजन२९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), जालना येथील वर्कशॉप क्रमांक २ मध्येकरण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात दहावी व बारावी उत्तीर्ण उमेदवार, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर व पदव्युत्तर उमेदवार, डिप्लोमा व अभियांत्रिकी पदवीधारक, अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, आयटीआय उत्तीर्ण तसेच अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थी आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या पात्र युवक-युवतींना सहभागी होता येणार आहे. विविध खासगी आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पात्र उमेदवारांसाठी २१ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे दोन सत्रांमध्ये रोजगारपूर्व तयारी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिलेल्या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या सर्व उमेदवारांनी २९सप्टेंबर रोजी आयोजित रोजगार मेळाव्यास उपस्थित राहावे, जेणेकरून त्यांना विविध आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालनाए. ए. केसकरतसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथील प्राचार्यए. ए. आलटेयांनी केले आहे.

# सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी संसाधन व्यक्तींची नोंदणी

## जालना जिल्ह्यातील इच्छुकपात्र व्यक्तींना १७ सप्टेंबरपर्यंत अर्जाची संधी

**जालना – प्रतिनिधी**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रियाउद्योग योजना () अंतर्गत जालना जिल्ह्यातसूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांनामार्गदर्शन करण्यासाठी संसाधनव्यक्तींची नोंदणी करण्यातयेणारआहे. यासाठी इच्छुकव पात्र व्यक्तींनी१७ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादरकरावेत, असे आवाहनजिल्हा अधीक्षक कृषीअधिकारी कार्यालयाकडून करण्यात आलेआहे. आत्मनिर्भर भारत पॅकेजअंतर्गतप्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनाही केंद्र पुरस्कृतयोजना राबविण्यातयेत आहे. राज्यनोडल एजन्सीच्या मार्गदर्शनाखालीजिल्ह्यातील सूक्ष्म अन्नप्रक्रियाउद्योगांना आवश्यक तांत्रिकव व्यावसायिक मार्गदर्शन मिळावे, यासाठी संसाधन व्यक्तींचीनोंदणी करण्यात येत आहे. या पदासाठीसर्व प्रकारच्या पदवीधारकांनाअर्ज करता येणार आहे. तसेच अन्नप्रक्रियाप्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल () तयारकरण्याचे ज्ञान वअनुभव असणे आवश्यकआहे. अन्नप्रक्रिया उद्योगातीलतंत्रज्ञान विकास, नवीनउत्पादन विकसित करणे, गुणवत्तेचे निकष, अन्नसुरक्षा व्यवस्थापन आदीबाबींमध्ये सल्ला देण्याचाअनुभव असलेल्या व्यक्तींनाप्राधान्य मिळणार आहे.संबंधित क्षेत्रातकिमान तीन वर्षांचाअनुभवअसणे अपेक्षित आहे.

लाभार्थ्यांना मिळणार मार्गदर्शन संसाधन व्यक्तींच्या माध्यमातूनसूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगसुरू करू इच्छिणाऱ्या तसेच विद्यमानउद्योगांचा विस्तार करूइच्छिणाऱ्या उद्योजकांनाप्रकल्प अहवाल तयारकरणे, तांत्रिक बाबी, उत्पादन विकास, अन्नसुरक्षा, गुणवत्ता व्यवस्थापनआणि बँक कर्जप्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत पात्र वैयक्तिकसूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांनापात्र प्रकल्प खर्चाच्या३५ टक्के किंवाकमाल १० लाखरुपये अनुदानमिळू शकते. त्यामुळेजिल्ह्यातील अन्नप्रक्रिया क्षेत्रातीलउद्योजकांना योजनेचा लाभ मिळवूनदेण्यासाठी संसाधन व्यक्तींचीभूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

अर्ज कुठे करावा? इच्छुक पात्र उमेदवारांनीआपले अर्जजिल्हा अधीक्षक कृषीअधिकारी कार्यालय, बचतभवन, मोतीबाग समोर, जालना येथे१७ सप्टेंबर २०२६ पर्यंत सादरकरावेत. योजनेची अधिकमाहिती च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पात्रव्यक्तींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाअधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्यावर बुधवारी रात्री तीन सलाईनद्वारे उपचार, प्रकृतीवर देखरेख सुरु

## जिल्हा आरोग्य यंत्रणेची माहिती

**जालना – प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची काल दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री साडेअकरा वाजता तपासणी

करण्यात आली. यावेळी त्यांना तीन बाटल्या आयव्ही फ्लयूड सलाईन लावण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य

यंत्रणेने दिली. श्री. जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे अन्न व पाण्याविना उपोषण करीत आहेत. त्यांच्या आरोग्य तपासणी व उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील वैद्यकीय पथके २४ तास कार्यरत आहेत. दि. ८ सप्टेंबर रोजी श्री. जरांगे पाटील यांना सात सलाईन लावण्यात आल्या होत्या. तसेच दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारीही त्यांची तपासणी करून एक सलाईन लावण्यात आली होती. त्यानंतर काल दि. ९ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० वाजता पुन्हा त्यांची तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना तीन सलाईनद्वारे आयव्हीफ्लयूड देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली आहे.

# प्रारूप मतदार यादीवरदावे-हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

## मतदारांनी यादी तपासूनआवश्यक ते अर्जदाखल करण्याचे आवाहन

**जालना – प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ () अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांचीप्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.या प्रारूप यादीच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३१ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६असा कालावधी देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने नागरिकांना आपले नाव व मतदार यादीतील तपशील तपासून आवश्यक असल्यास विहित नमुन्यात अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. या कालावधीत मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठीनमुना क्रमांक ६, नावाच्या समावेशाला आक्षेप घेण्यासाठीनमुना क्रमांक ७, तर मतदाराच्या नोंदीतील दुरुस्ती, मतदार ओळखपत्रातील बदल तसेच दिव्यांग चिन्हांकनासाठीनमुना क्रमांक ८मध्ये अर्ज करता येणार आहे. तसेच मतदारसंघातील अन्य ठिकाणी स्थलांतर झाल्यामुळे पत्त्यात बदल करण्यासाठीही नमुना क्रमांक ८ अंतर्गत अर्जाची सुविधा उपलब्ध आहे. दरम्यान, प्रारूप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करणे, वगळणे किंवा दुरुस्ती करण्यासंदर्भातखोटी माहिती अथवा खोटे घोषणापत्र सादर करू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधीलकलम ३१नुसार मतदार यादीच्या तयारी, पुनरीक्षण, दुरुस्ती किंवा नावाचा समावेश-वगळण्यासंदर्भात जाणीवपूर्वक खोटी माहिती अथवा घोषणा करणाऱ्या व्यक्तीसएक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्हीअशी शिक्षा होऊ शकते.

प्रारूप मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा अन्य तपशीलांमध्ये काही त्रुटी असल्यास नागरिकांनी मुदतीपूर्वी संबंधित अर्ज दाखल करावेत. मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी आणि -२०२६ संदर्भातील दावे-हरकती दाखल करण्यासाठीमुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्रयांच्या अधिकृत संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दावे-हरकतींसाठी महत्त्वाचे नमुने : नमुना ६ :मतदार यादीत नवीननाव समाविष्ट करण्यासाठी. नमुना ७ :मतदार यादीतील नावाच्या समावेशाला आक्षेप/ नावव गळण्या संदर्भातील अर्जासाठी. नमुना ८ :नोंदीतील दुरुस्ती, मतदारओळखपत्रातील बदल, दिव्यांगचिन्हांकन तसेच पत्ताबदलासाठी.

नागरिकांनी ३० सप्टेंबरपूर्वी आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन निवडणूक यंत्रणेकडून करण्यात आले आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात

## जालना जिल्ह्यात आतापर्यंत १२६ अर्ज प्राप्त

**जालना -प्रतिनिधी**

कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात मंडळस्तरावर १२ शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये आतापर्यंत एकूण १२६ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे. तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये जालना तालुक्यातील दोन शिबिरांत १३, बदनापूरमधील एका शिबिरात १०, अंबडमधील एका शिबिरात २, घनसावंगीतील दोन शिबिरांत २०, भोकरदनमधील तीन शिबिरांत ५३, जाफराबादमधील एका शिबिरात १६, परतूरमधील एका शिबिरात ६ आणि मंठा तालुक्यातील एका शिबिरात ६ अर्जांचा समावेश आहे. प्राप्त १२६ अर्जांपैकी समितीअंतर्गत ७८, तर गॅझेटअंतर्गत ४८ अर्ज आहेत. काही प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, उर्वरित प्रकरणांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी कळविले आहे.

# अंबड शहरातील राष्ट्रीय महामार्गाने घेतला मोकळा श्वास!

## जालना- वडीगोद्री रस्त्यावरील अंबड शहरातील; ९२२५ अतिक्रमणे हटविली; उर्वरित ७५ अतिक्रमणांवर कारवाई होणार

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक -७५३ जालना-वडीगोद्री रस्त्यावरीलअंबड शहरातील अतिक्रमणांविरोधात प्रशासनाच्यावतीने धडक कारवाई करण्यात आली. महामार्गाच्या हद्दीत असलेल्या एकूण सुमारे ३०० अतिक्रमणांपैकी २२५ अतिक्रमणे दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी हटविण्यात आली असून, उर्वरित ७५ अतिक्रमणांवर उद्या कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या समन्वयाने धडक कारवाई

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल (भा.प्र.से.), पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू (भा.पो.से.) तसेच कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या संयुक्त पथकाने अतिक्रमण हटविण्याची धडक मोहीम राबविली.

या कारवाई मध्ये उपविभागीय अधिकारी अंबड, पोलिस उप अधीक्षक अंबड व तसेच उपअभियंता रा. म. उपविभाग यांच्या समन्वय पथकाने सक्रिय सहभाग घेतला. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे हटविण्याची प्रभावी कार्यवाही करण्यात आली.



३०० अतिक्रमणांपैकी २२५ अतिक्रमणे हटविली; उर्वरित ७५ अतिक्रमणांवर उद्या होणार कारवाई

-७५३ च्याअंबड शहर हद्दीत एकूण ३०० अतिक्रमणे निदर्शनास आली होती. त्यापैकी २२५ अतिक्रमणे आज रोजी हटविण्यात आली असून, उर्वरित ७५ अतिक्रमणांवर उद्या कारवाई करण्यात येणार आहे.

या कारवाईमुळे राष्ट्रीय महामार्गाची हद्द अतिक्रमण मुक्त होऊन वाहतूक सुरळीत होण्यास, रस्त्याची सुरक्षितता वाढण्यास आणि नागरिकांना सुरक्षित व मोकळा मार्ग उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

अतिक्रमण हटविण्याची ठळक कामगिरी

राष्ट्रीय महामार्ग NH-753H

ठिकाण अंबड शहर

एकूण अतिक्रमणे ३००

हटविण्यात आलेली अतिक्रमणे २२५

उर्वरित अतिक्रमणे ७५

राष्ट्रीय महामार्ग विभाग, जालना, महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त सहकार्याने ही मोहिम राबविण्यात येत आहे.

---

# हैंदराबाद पोलिसांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही हवे महिनाभर आधीचे नियोजन; गणेशोत्सवानंतर तातडीने समन्वय बैंठकीची गरज

## ॲड. महेश धनावत यांच्या पत्राच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सक्रिय पावले उचलण्याची अपेक्षा

**जालना । प्रतिनिधी**

गणेशोत्सवादरम्यान सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत शेजारील तेलंगणा राज्यातील हैदराबाद पोलीस आयुक्त व्ही. सी. सज्जनार यांनी भाग्यनगर गणेश उत्सव समितीसोबत तब्बल एक महिना आधीच समन्वय बैठक घेऊन महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. रस्त्यांवरील २२ फुटांच्या विद्युत तारा आणि ४ फुटांचे वाहन लक्षात घेऊन दुर्घटना टाळण्यासाठी मूर्तींची उंची १५ फुटांच्या आत ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. महिनाभर आधीच या सूचना आल्यामुळे मूर्ती तयार होण्याच्या टप्प्यातच मंडळांना आणि मूर्तिकारांना योग्य निर्णय घेणे सहज शक्य झाले. या वेळेत घेतलेल्या दूरगामी नियोजनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**जालन्यात बैठक झाली, मात्र वेळेचे गणित जुळणे आवश्यक**

जालन्यातही काही दिवसांपूर्वी गणेश मंडळांची बैठक पार पडली; प्रशासनाने संवाद साधण्याचा चांगला प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत बहुतांश मंडळांचे मूर्ती बुकिंग व तयारी पूर्ण झाली असल्याने ही बैठक काहीशी उशिरा ठरली. या संदर्भात ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महेश धनावत यांनी प्रशासनाला पत्र देऊन सर्व गणेश मंडळांची संयुक्त बैठक घेऊन वेळेत मार्गदर्शक तत्त्वे ठरवण्याची आग्रही व विधायक मागणी केली होती.

मंडळांना दरवर्षी मूर्तींचे बुकिंग अनेक महिने आधी करावे लागते. त्यामुळे ऐन तोंडावर निर्णय घेण्याऐवजी, यंदाचा उत्सव संपन्न होताच जालना जिल्हा प्रशासनाने प्राधान्याने सक्रिय होत सर्व गणेश मंडळांची संयुक्त बैठक बोलवणे ही काळाची खरी गरज बनली आहे. शेजारील राज्यांशी विचारविनिमय आणि राज्यस्तरीय धोरणाची आवश्यकता गणेशोत्सव हा केवळ एका शहरापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव आहे. त्यामुळे केवळ जालना प्रशासनानेच नव्हे, तर महाराष्ट्र शासनानेही या विषयाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. हैदराबादसारख्या शेजारील राज्यांतील शहरांनी महिनाभर आधी घेतलेले निर्णय आणि राबवलेल्या सुरक्षा पद्धतींचा अभ्यास करून, गरज भासल्यास त्यांच्याशी सल्लामसलत करून एक सर्वसमावेशक राज्यस्तरीय धोरण आखले जाऊ शकते.

उत्सव संपल्यानंतर लगेचच प्रशासन सक्रिय झाल्यास पुढील वर्षाच्या नियोजनासाठी पुरेसा अवधी मिळेल. यामुळे मूर्तिकार व मंडळांना मूर्तींची उंची, विद्युत तारांची सुरक्षितता आणि मिरवणूक मार्गांचे निकष आधीच स्पष्ट होतील, ज्यामुळे बुकिंग करणे सुलभ होईल. प्रशासनाच्या या सकारात्मक आणि सक्रिय पुढाकारामुळे पुढील वर्षाचा गणेशोत्सव अधिक निर्विघ्न, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात साजरा होण्यास मोठी मदत होईल.

---

# दीन-दुबळ्या, शोषितांच्या हक्कांसाठी मानवाधिकार संघटना मैदानात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला, कामगार व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणार

**जालना - प्रतिनिधी**

समाजातील दीन-दुबळ्या, शोषित व वंचित घटकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार एसोसिएशनच्या माध्यमातून जिल्ह्यात व्यापक कार्य उभारण्यात येणार असल्याची माहिती नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अरुण पेरे यांनी दिली. दरम्यान, जिल्हा महासचिव शैलेश देशमुख यांनी आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला, कामगार आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार एसोसिएशनच्या जालना जिल्हाध्यक्षपदी अरुण पेरे, तर जिल्हा महासचिवपदी शैलेश देशमुख यांची नियुक्ती



झाल्याबद्दल जालना शहरात विविध ठिकाणी त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी आमदार संतोष सांबरे, महानगरपालिका स्थायी समिती सभापती अशोकअण्णा पांगारकर,मनोज देशमुख, शिवराज जाधव, अनिल व्यवहारे, वासुदेव देवडे, श्रीकांत देवडे, दीपक गडेकर, महिला नगरसेविका अरुणाताई जाधव यांच्यासह प्रतिष्ठित नागरिकांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना जिल्हाध्यक्ष अरुण पेरे म्हणाले की, मानवाधिकार संघटनेच्या माध्यमातून समाजातील दीन, दुबळ्या, शोषित व वंचित घटकांना त्यांच्या हक्क व अधिकारांबाबत जागृत करण्यात येईल. शासनाच्या विविध विभागांमार्फत सर्वसामान्य नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधून काम करण्यात येणार आहे. नागरिकांच्या अडचणी व समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून त्या सोडविण्यासाठी संघटना सातत्याने पाठपुरावा करेल, असे त्यांनी सांगितले. समाजसेवा आणि लोककल्याणाला प्राधान्य देत जिल्ह्यात आगामी काळात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तालुका स्तरावरील संघटनेच्या नियुत्तया लवकरच पूर्ण करण्यात येणार असून, समाजसेवेची आवड असलेल्या होतकरू तरुणांना संघटनेशी जोडण्यात येणार आहे.

---

# जालना जिल्हा जनगणना हस्तपुस्तिकेचे काम पूर्ण

**जालना – प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका ( ....) तयार करण्याचे काम पूर्ण झाल्याचे जिल्हा निवडणुक जनगणना अधिकारी यांनी कळविले आहे.

जनगणना २०२७ अंतर्गत दि. १६ ऑगस्ट २०२६ ते दि. १४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात जिल्हा जनगणना हस्तपुस्तिका संकलनाचे काम करण्यात आले. या हस्तपुस्तिकेत जिल्ह्यातील प्रत्येक गाव व शहरासंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण माहितीचा समावेश करण्यात येतो. जनगणना हस्तपुस्तिका हे जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीचे अधिकृत दस्तऐवजीकरण करणारे महत्त्वाचे साधन मानले जाते.

हस्तपुस्तिकेमध्ये जिल्ह्यातील लोकसंख्या, भौगोलिक व सामाजिक वैशिष्ट्ये, शैक्षणिक सुविधा, वैद्यकीय सुविधा, रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय, वीजपुरवठा तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित अद्ययावत माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन, विविध शासकीय योजना राबविणे तसेच प्रशासकीय निर्णय घेण्यासाठी या माहितीचा उपयोग होणार आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा प्रधान जनगणना अधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्यात आले. भारताच्या जनगणना कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात हे काम नियोजित पद्धतीने पूर्ण करण्यात आले असून, त्यासाठी जिल्ह्यातील एकूण ८७२ क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कामात सहकार्य केले. यात ग्राम विकास अधिकारी, कृषी सहाय्यक यांनी १० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मोबाईल ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील ९६४ गावांची तसेच ०३ नगरपालिका आणि ०५ नगरपंचायत क्षेत्रातील माहिती संकलीत करण्याचे १०० टक्के काम पूर्ण केले. जनगणना हस्तपुस्तिकेसाठी जिल्ह्यातील प्रत्येक गाव व शहरातील माहिती संकलित करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात काम केले. या माहितीच्या आधारे जिल्हा जनगणना हस्तपुस्तिकेचे काम पूर्ण करण्यात आले.

---

# विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर येथे लिओ क्लब च्या सहकार्याने ‘शाडू मातीची गणेशमूर्ती’ कार्यशाळा संपन्न

## चिमुकल्यांनी दिला पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश

**परतूर - प्रतिनिधी**

येथील विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये आज, १० सप्टेंबर रोजी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने शाडू मातीचे सुंदर गणपती बाप्पा साकारत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण धडा गिरवला.

कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ‘‘प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) च्या मूर्ती दिसायला आकर्षक वाटत असल्या, तरी त्या



पर्यावरणासाठी आणि जलचरांसाठी अत्यंत घातक ठरतात. त्याऐवजी पाण्यात सहज विरघळणाऱ्या शाडू मातीच्याच मूर्तींची प्रतिष्ठापना करणे काळाची गरज आहे.‘ तसेच, ‘‘अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना हक्काचा वाव मिळतो आणि त्यांच्यात निसर्गाविषयी सजगता निर्माण होते,‘‘ असे मत शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. संदीप बाहेकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळा, परतूरच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता शिंदे व लिओ क्लब चे पदाधिकारी प्रमुख पाहुने म्हणून उपस्थित होत्या.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विवेकानंद पब्लिक स्कूलचे प्राचार्य विजयकुमार दंदाले, विवेकानंद इंग्लिश स्कूलचे प्राचार्य भालचंद्र महाजन यांच्यासह सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती साकारण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. शाळेने यापुढेही असे नवनिर्मितीक्षम उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांनी या वेळी केली.

---

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड समितीची बैठक संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

राज्य महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या ‘उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६’ साठी जालना जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या जिल्हास्तरीय निवड समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे १० सप्टेंबर २०२६ रोजी उपजिल्हाधिकारी (महसूल) मनिषा देशपांडे, जालना यांच्या अध्यक्षेत पार पडली. या बैठकीत शासनाने दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या निर्देशांनुसार आगामी गणेशोत्सवासाठी जिल्ह्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मंडळांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची मंडळे निवडण्याची प्रक्रिया राबविण्याबाबत समितीमध्ये चर्चा झाली.

यावेळी बैठकीस नगरपालिका प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त तथा सदस्य सचिव शिवाजी गवळी, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकणी, जिपच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश अग्निहोत्री, गजानन पडूळ, संपदा कुलकर्णी आदीची उपस्थिती होती.

समितीने गणेशोत्सव मंडळांच्या सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांचा विचार करून शासनाने निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे परीक्षण करण्याबाबत चर्चा केली. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक प्रबोधन, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, सामाजिक बांधिलकी, महिला व युवकांचा सहभाग तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांचा प्रभावी माध्यम म्हणून साजरा व्हावा, यासाठी शासनाकडून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर उत्कृष्ट काम करणाऱ्या मंडळांची जिल्हास्तरावर निवड करून त्यांची शिफारस करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. जिल्हास्तरीय निवड समितीने संबंधित मंडळांच्या कामकाजाचे शासनाच्या निकषांनुसार मूल्यमापन करून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाची मंडळे निश्चित करावीत व त्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

---

# जालन्यात रंगणार दोन दिवसीय ‘लोकसंगीत महोत्सव’

**१५ व १६ सप्टेंबर रोजी जे.ई.एस. महाविद्यालयात लोकसंगीताची सुरेल मेजवानी; विविध लोककलावंतांचे सादरीकरण**

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंगीत परंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने जालना येथे दोन दिवसीय ‘लोकसंगीत महोत्सवा’चे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार, दि. १५ सप्टेंबर आणि बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ५.३० वाजता जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे हा महोत्सव होणार आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी विनल देशमुख, रमानंद उगळे, अश्विनी मिठे आणि शाहीरा माधवी माळी यांच्या लोकसंगीत व लोककलाविष्कारांचे सादरीकरण होणार आहे. तर बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी श्रावणी महाजन, कुणाल वरळे, सानिका शिर्के आणि चेतन लोखंडे हे कलाकार आपल्या सादरीकरणातून रसिकांना लोकसंगीताची सुरेल अनुभूती देणार आहेत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि लोकजीवनाशी घट्ट नाते असलेल्या लोकसंगीतामध्ये विविध भागांतील परंपरा, बोलीभाषा, जीवनशैली, सामाजिक वास्तव आणि सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब उमटते. या समृद्ध लोकपरंपरेला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच नव्या पिढीला महाराष्ट्राच्या लोकसंगीताची ओळख व्हावी, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विविध लोककला, लोकसंगीत, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन व प्रसार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या महोत्सवासाठी प्रवेश विनामूल्य असून जालना व परिसरातील रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दोन दिवसीय ‘लोकसंगीत महोत्सवा’चा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडकर यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.